Email - dpostpune@gmail.com

Website - www.msrtc.gov.in

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे विभाग

विभागीय कार्यालय, शंकरशेठ रोड, पुणे - ३७. दुरध्वनी - (०२०) २४४४१२७२

दि.०४ जानेवारी, २०२४

**जाक्र/राप/विनिपु/आस्था/नोभ/१५४/२४**

प्रति,

मा. संपादक

दैनिक -----------------------

**विषय:- शिकाऊ उमेदवार भरती सन - २०२४ अंतर्गत बातमी प्रसारित करणेबाबत.**

महोदय,

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ पुणे विभागामध्ये शिकाऊ उमेदवार पदासाठी भरती प्रक्रिया सुरु करण्यात आलेली असून वर नमुद केलेल्या पदासाठी जाहिरात ही www.apprenticeshipindia.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर बातमीस आपल्या दैनिक वर्तमान पत्रामध्ये ठळक स्वरुपात प्रसिद्धी देण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

विभाग नियंत्रक,

रा. प. पुणे

## बातमी

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभागामध्ये, शिकाऊ उमेदवार या पदासाठी भरती प्रक्रिया सुरु करण्यात आलेली असून वर नमूद पदासाठी जाहिरात ही www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यानुसार इच्छूक उमेदवारांना अर्ज भरण्यासाठी मा. विभाग नियंत्रक, रा. प. पुणे यांचे मार्फत आवाहन करण्यात येत आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख **२२/०१/२०२४** पर्यंत असून सदर शिकाऊ उमेदवार भरतीसाठी खुल्या प्रवर्गाकरिता रु.६००/- व मागासवर्ग प्रवर्गासाठी रु. ३००/- इतक्या रकमेचा डिमांड ड्राफ्ट "MSRTC Fund Account Pune" या नावाने काढून तो सदर अर्जासोबत जोडावा.

तरी इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत विभाग नियंत्रक, रा प विभागीय कार्यालय, शंकरशेठ रोड, पुणे - ४११०३७ या पत्त्यावर दि.१६/०१/२०२४ ते दि.२२/०१/२०२४ या कालावधीत समक्ष हजर राहून सकाळी १०:०० ते १७:३० या कार्यालयीन वेळेत (शनिवार व रविवार वगळून) सादर करावी.

Email - dpostpune@gmail.com

Website - www.msrtc.gov.in

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे विभाग

विभागीय कार्यालय, शंकरशेठ रोड, पुणे - ३७. दुरध्वनी - (०२०) २४४४१२७२

जाक्र/राप/विनिपु/आस्था/नोभ/शिऊ/१५३/२४

दि.०४ जानेवारी, २०२४

प्रति,
मा. सहाय्यक सल्लागार, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण / अंशकालीन प्राचार्य,
मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषांगिक सूचना केंद्र,
घोले रोड, पुणे - ४११००५

विषय:- शिकाऊ उमेदवार कायदा १९६१/७२/८६ अन्वये प्रशिक्षणार्थी सत्र जानेवारी, २०२४ करिता उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरणेबाबत सुचित करणे.

महोदय,

शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१/७२/८६ अन्वये पुणे विभागात जानेवारी, २०२४ सत्रासाठी निरनिराळ्या व्यवसायात खाली दर्शविल्याप्रमाणे शिकाऊ उमेदवारांची प्रशिक्षणार्थी म्हणून निवड करावयाची आहे.

| अ. क्र. | व्यवसायाचे नाव | आवश्यक शिकाऊ उमेदवार संख्या |
|---|---|---|
| १ | मॅकेनिक डिझेल | २६ |
| २ | मेकॅनिक मोटार व्हेईकल | ७१ |
| ३ | मेकॅनिक (एअर कंडिशन) | ०४ |
| ४ | मोटार व्हेईकल बॉडी बिल्डर (शिटमेटल) | ३२ |
| ५ | ॲटो इलेक्ट्रीशियन | २५ |
| ६ | वेल्डर | २० |
| ७ | पेंटर | ०४ |
| ८ | टर्नर | ०४ |
| ९ | बेंच फिटर / फिटर | ०२ |
| १० | को. पा. (कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट) | ०४ |
| | **एकूण** | **१९२** |

आवश्यक शैक्षणिक पात्रता, वय, विद्यावेतन, इ. बाबतचा तपशील सोबतच्या विहित नमुन्यातील मागणी पत्रात दिलेला आहे. शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केल्यानंतर सदर शिकाऊ उमेदवारांस रा. प. महामंडळ, पुणे विभागात सहाय्यक पदाच्या सरळसेवा भरतीच्या वेळी सहाय्यक पदासाठी थेट अर्ज करता येईल. मात्र त्यांना महामंडळाच्या सेवेत सामावून घेण्याचे बंधन महामंडळावर राहणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी. शिकाऊ उमेदवारीकरिता सन २०२२ २०२३ या वर्षी आय टी आय परिक्षा पास झालेले असावेत.

Received
5/1/24

सदर प्रक्रियेत कालमर्यादा असल्याने आपल्या संस्थेतून आय.टी.आय. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना या **www.apprenticeshipindia.gov.in** संकेत स्थळावर एम.आय.एस. वेबपोर्टलवर शिकाऊ उमेदवारीबाबत रजिस्ट्रेशन करणेबाबत सुचना देण्यात यावी. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभागाचा आस्थापना रजिस्ट्रेशन क्र.**E10162700633** असा आहे. कृपया शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणासाठी नमूद केल्याप्रमाणे सर्व अटींची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांना दि.२२ जानेवारी, २०२४ पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याबाबत सुचना देण्यात याव्यात तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत विभाग नियंत्रक, रा. प. विभागीय कार्यालय, शंकरशेठ रोड, पुणे - ४११०३७ या पत्त्यावर दि.१६ जानेवारी, २०२४ ते दि.२२ जानेवारी, २०२४ या कालावधीत समक्ष हजर राहून सकाळी १०:०० ते १७:३० या कार्यालयीन वेळेत (शनिवार व रविवार वगळून) सादर करावी.

**विभाग नियंत्रक,**
**रा. प. पुणे**

स्थानप्रत
म.का.प्रतेत
०४/०१/२०२४
०४.०१

| अ. क्र. | पदाचे नाव | भरावयाची पदे | शैक्षणिक पात्रता व इतर अर्हता |
|---|---|---|---|
| १ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | ७१ | एस.एस.सी. उत्तीर्ण, सरकार मान्य आयटीआय ०२ वर्षे (मोटार यांत्रिक) अभ्यासक्रम परीक्षा उत्तीर्ण (NVCT) |
| २ | ॲटो इलेक्ट्रीशियन | २५ | एस.एस.सी. उत्तीर्ण, सरकार मान्य आयटीआय मधील इलेक्ट्रिशियन अभ्यासक्रम परीक्षा उत्तीर्ण (NVCT) |
| ३ | मोटार व्हेईकल बॉडी बिल्डर (शिटमेटल) | ३२ | एस.एस.सी. उत्तीर्ण, सरकार मान्य आयटीआय मधील शिट मेटल (पत्रे कारागीर लोहारीचा) अभ्यासक्रम परीक्षा उत्तीर्ण (NVCT) |
| ४ | मेकॅनिक डिझेल | २६ | एस.एस.सी. उत्तीर्ण, सरकार मान्य आयटीआय मधील मेकॅनिक डिझेल अभ्यासक्रम परीक्षा उत्तीर्ण (NVCT) |
| ५ | वेल्डर | २० | एस.एस.सी. उत्तीर्ण, सरकार मान्य आयटीआय मधील वेल्डर (सांधाता) अभ्यासक्रम परीक्षा उत्तीर्ण (NVCT) |
| ६ | पेंटर (जनरल) | ०४ | एस.एस.सी. उत्तीर्ण, सरकार मान्य आयटीआय मधील पेंटर अभ्यासक्रम परीक्षा उत्तीर्ण (NVCT) |
| ७ | मेकॅनिक (एअर कंडिशन) | ०४ | एस.एस.सी. उत्तीर्ण, सरकार मान्य आयटीआय मधील यांत्रिकी (रेफ्रिजरेशन व एअर कंडिशनिंग) अभ्यासक्रम परीक्षा उत्तीर्ण (NVCT) |
| ८ | टर्नर | ०४ | एस.एस.सी. उत्तीर्ण, सरकार मान्य आयटीआय मधील टर्नर अभ्यासक्रम परीक्षा उत्तीर्ण (NVCT) |
| ९ | बेंच फिटर / फिटर | ०२ | एस.एस.सी. उत्तीर्ण, सरकार मान्य आयटीआय मधील बेंच फिटर / फिटर अभ्यासक्रम परीक्षा उत्तीर्ण (NVCT) |
| १० | को. पा. (कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट) | ०४ | एस.एस.सी. उत्तीर्ण, सरकार मान्य आयटीआय मधील कॉम्प्युटर ऑपरेटर अभ्यासक्रम परीक्षा उत्तीर्ण (NVCT) |

**वयोमर्यादाः-** वरील सर्व पदांसाठी दि.०८ जानेवारी, २०२४ रोजीचे वय १८ वर्षांपेक्षा कमी व ३३ वर्षांपेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांचे वय ३८ पेक्षा जास्त नसावे.